किंमत - वार्षिक वर्गणी २००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक

३ ● समीक्षण
५ ● स्मरण...प्रगल्भ आणि मूलभूत अर्थचिंतनाचे
१५ ● राष्ट्रवादाच्या आकर्षणामागील अर्थवास्तव
२३ ● आर्थिक राष्ट्रवाद आणि राजकारण

खंड १६ : अंक ८ नोव्हेंबर २०१७

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

वार्षिक वर्गणी २००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०) वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.** **'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०,
२५६५७६९७
ई-मेलः- ispe@vsnl.net
website- www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड १६ (अंक ८) नोव्हेंबर २०१७**
**संपादक - अभय टिळक**

### *'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- ●उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- ●अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- ●निःपक्ष व साधार
- ●सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियत-कालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

### *अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- ●मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- ●निवडक साहित्याचे संकलन
- ●संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- ●संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

●या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

●अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# समीक्षण

बघता बघता चालू कॅलेंडर वर्षाचे ११ महिने उलटलेसुद्धा. नोव्हेंबर महिन्याची सुरुवातच मुळात झाली ती 'नोटबदली'नामक आक्रिताच्या वर्षपूर्तीनिमित्ताने चौफेर उडालेल्या चर्चा-वादविवादांच्या धुरळ्याने आणि राजकीय धुळवडीनेदेखील. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी रात्री आठ वाजता देशाच्या पंतप्रधानांनी देशवासीयांना उद्देशून केलेल्या भाषणाची आठवण ७ आणि ८ नोव्हेंबर २०१७ या दिवशी सगळ्यांनाच प्रकर्षाने झाली. नोटाबदलीचे उचलले गेलेले ते पाऊल निश्चितच अकस्मात आणि तितकेच अनाकलनीय होते, यात वादच नाही. पुरते एक वर्ष त्यांवर चर्चा-टीका होत राहिली. गंमतीचा भाग म्हणजे, बहुतांश विचारविमर्श विवेकाधिष्ठित असण्यापेक्षाही विकारवशतेकडे झुकणाराच राहिला. नोटाबदलीच्या निर्णयाचे टोकाचे समर्थन किंवा टोकाचा विरोध या दोन ध्रुवांवरच वादी-प्रतिवादी ठाम राहिले. फारसे तारतम्य कोणीच दाखवले नाही. नोटाबदलीसारख्या मूलतः आर्थिकदृष्ट्या उत्पातक निर्णयाचे तात्कालीक तसेच दूरगामी भलेबुरे परिणाम विश्लेषून सांगणा-या अर्थवेत्यांच्या विवेचनाकडे गेल्या संपूर्ण वर्षभरात कोणीही गांभीर्याने कान दिला नाही. एक वर्ष झाल्यानंतर, साहजिकच, ८ नोव्हेंबर २०१६ या दिवशी घेतल्या गेलेल्या त्या निर्णयाच्या यशापयशाची चिकित्सा हिरिरीने केली जावी अथवा केली गेली यांत अस्वाभाविक असे काही नव्हते. खरी गंमत पुन्हा आहे ती इथेच. ज्या कृतीमागील उद्दिष्टेच स्पष्ट वा निरपवाद नव्हती अशा कृतीचे यशापयश मोजायचे तरी कोणत्या निकषांवर, हा प्रश्न ७ व ८ नोव्हेंबर २०१७ रोजी वाहिन्यांवर झळकणा-या सगळ्यांच बोलभांडांपुढे, वास्तविक पाहता, होता. भ्रष्टाचार आणि करबुडवेगिरी करून मिळवलेल्या बेहिशेबी धनावर हातोडा चालवणे आणि नकली नोटांच्या माध्यमातून उघडल्या गेलेल्या आर्थिक दहशतवादाचा कणा मोडणे, हे दोन प्रधान हेतू नोटाबदलीच्या निर्णयामागे आहेत, असे प्रधानमंत्र्यांचे निवेदन सांगत होते. नोटाबदली अंमलात आणल्यानंतर जवळपास पंधरवडा उलटून गेल्यानंतर, ''नोटाबदली हे रोकडरहित अर्थव्यवस्थेतील 'डिजिटल' व्यवहारांच्या विश्वात प्रवेश



करण्यासाठी उचललेले पहिले पाऊल आहे'', असे धोरणकर्ते बोलायला लागले. म्हणजे, नोटाबदलीमागील कारणपरंपरा तिपदरी बनली. या तीनही प्रतिपादनांमधील सत्यांश खरोखरच कितपत आणि काय कसाचा होता, याचा प्रत्यय गेल्या संपूर्ण वर्षभरात आपल्या सगळ्यांनाच आला. पाचशे रुपये व एक हजार रुपये दर्शनी मूल्याच्या जुन्या नोटा हद्दपार झाल्यानंतर पहिले दोन महिने सर्वसामान्यांना प्रचंड मनस्ताप आणि व्यावहारिक तसेच व्यावसायिक कुचंबणा सहन करावी लागली. तरीही, सामान्य माणसाने प्रचंड तितिक्षा दाखवली, हे विशेष. सर्वसामान्य भारतीय नागरिक सोशीक आहे, या परंपरागत समजुतीवर त्यांमुळे पुन्हा एकवार शिक्कामोर्तब झाले हे तर खरेच. त्याचप्रमाणे, एखादा अनाकलनीय निर्णय व्यापक स्तरावर स्वीकारार्ह बनवण्यासाठी त्याचे आकर्षक 'पॅकेजिंग' करून परिणामकारक 'मार्केटिंग' करण्याचे सत्ताधीशांचे कौशल्यही त्यांतून डोळ्यांत भरले, हे मान्यच केले पाहिजे. ***(कृपया पृष्ठ २८ पाहावे)***

## वाचकांना विनंती

'अर्थबोधपत्रिके'चा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यासाठी www.ispepune.org.in इथे वाचकांनी अवश्य भेट द्यावी.**

## निवेदन

● ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.

● लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

इतिहास

# स्मरण...प्रगल्भ आणि मूलभूत अर्थचिंतनाचे

अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्याला 'डेव्हिड रिकार्डो' हे नाव परिचित असतेच असते. आधुनिक अर्थशास्त्राचे जनक समजल्या जाणा-या ॲडम स्मिथ यांच्या जोडीने ज्यांचे नाव आदराने घेतले जाते असा हा १८व्या आणि १९व्या शतकाच्या संधिकाळातील विख्यात अर्थतज्ज्ञ. देशादेशांदरम्यान होणारा व्यापार उभयपक्षांना का व कसा लाभदायक ठरतो त्याचे अर्थशास्त्रीय स्पष्टीकरण मांडणारा हा अर्थवेत्ता. किंबहुना, आपल्याला आवश्यक असणा-या सर्व प्रकारच्या वस्तू व सेवा आपल्याच चतु:सीमांमध्ये उत्पादन करण्याच्या भौतिक व तांत्रिक सुविधा हाताशी असल्या तरी प्रत्येक देशाने सर्वच्या सर्व वस्तू आणि सेवांचे उत्पादन करण्याचा बालहट्ट सोडून, ज्या वस्तू आणि सेवांच्या उत्पादनामध्ये आपल्याला तौलनिक लाभ (निखळ अर्थशास्त्रीय परिभाषेत यास 'कम्पॅरिटिव्ह कॉस्ट ॲडव्हान्टेज्' असे म्हणतात) आहे, अशाच वस्तू व सेवांच्या निर्मितीवर लक्ष केंद्रित करावे, हे आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या उपपत्तीसंदर्भातील एक अजोड आणि पायाभूत प्रमेय मांडल्यामुळेच रिकार्डो अर्थशास्त्राच्या ज्ञानक्षेत्रात अजरामर बनले.

रिकार्डो हे अर्थशास्त्राकडे तसे अवचितच वळले. मुळातच बुद्धिमत्ता तल्लख असल्याने अल्प कालावधीतच राजकीय अर्थविज्ञानाबाबतचे (पोलिटिकल इकॉनॉमी) त्यांचे आकलन औरसचौरस सघन व प्रगल्भ बनले. तत्कालीन प्रचलीत अर्थव्यवहारातील घटितांसंदर्भात त्यांनी लिहिलेला पहिलावहिला लेख १८०९ साली प्रकाशित झाला आणि त्या नंतर अवघ्या आठच वर्षांत, म्हणजे, १८१७ साली 'प्रिन्सिपल्स् ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी ॲन्ड टॅक्सेशन' हा रिकार्डो यांचा ग्रंथ प्रकाशित झाला. अर्थवेत्ते म्हणून रिकार्डो यांना त्रिखंडात ख्याती मिळवून दिली ती याच ग्रंथाने. २०१७ हे त्या ग्रंथाचे आणि पर्यायाने रिकार्डो यांचे मूलगामी अर्थचिंतन शब्दबद्ध होण्याचे द्विशताब्दी वर्ष. रिकार्डो यांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांचे दिशादर्शक पायाभूत अर्थचिंतन यांची उजळणी या प्रसंगी करणे उचित ठरावे.



लंडन येथे एका ज्यू दांपत्याच्या पोटी डेव्हिड रिकार्डो यांचा जन्म १८ एप्रिल १७७२ रोजी झाला. बाळगोपाळांनी भरलेला असा तो परिवार होता. एकंदर १७ भावंडांमधील रिकार्डो हे तिसरे अपत्य. केवळ खाऊन-पिऊन सुखीच नव्हे तर आर्थिकदृष्ट्या संपन्न असे ते कुटुंब होते. शेअर बाजारातील एक यशस्वी व्यावसायिक दलाल म्हणून रिकार्डो यांचे वडील गणले जात असत. त्यांमुळे, बालपणीच औपचारिक शालेय शिक्षण फारसे सुरळीत होऊ शकले नाही तरी, डेव्हिड रिकार्डो यांच्यावर दर्जेदार शिक्षणाचे संस्कार घडावेत यासाठी त्यांच्या आईवडिलांनी खासगी शिकवणीची जोड रिकार्डो यांच्या औपचारिक शालेय शिक्षणाला पुरवली. तर्कशुद्ध विचारसरणी आणि अमूर्त संकल्पनांबाबत चिंतन करण्याची क्षमता या गुणांची चमक रिकार्डो यांनी त्यांच्या लहानपणीच दाखवलेली होती.

वयाच्या अवघ्या १४व्या वर्षीच डेव्हिड यांच्या व्यावसायिक जीवनाचा श्रीगणेशा झाला. वडिलांच्या बरोबर शेअर बाजारात काम करण्यास रिकार्डो यांनी सुरुवात केली. त्या नंतर सातच वर्षांनी, म्हणजे, वयाच्या २१व्या वर्षी त्यांचा प्रेमविवाह झाला. त्या आंतरधर्मीय प्रेमविवाहाला घरातून कडवा विरोध असल्याने डेव्हिड यांच्या कुटुंबात बखेडा उभा राहिला. परिणामी, त्यांना कुटुंबातून सपत्नीक बाहेर पडावे लागले. कौटुंबिक स्तरावरील त्या सगळ्या उलथापालथीची कोणतीही झळ डेव्हिड यांच्या व्यावसायिक यशाला मात्र लागली नाही. शेअर बाजारातील एक अतिशय हिकमती आणि यशस्वी दलाल या नात्याने डेव्हिड यांनी उदंड यश व नावलौकिक संपादन केला. त्या काळात, रिकार्डो यांच्या मृत्युसमयी, त्यांची मालमत्ता जवळपास पावणेआठ लाख पौंडांच्या घरात होती, यांवरून त्यांच्या व्यावसायिक कर्तबगारीची कल्पना यावी. लौकिकदृष्ट्या स्थिरस्थावर झाल्यानंतर वयाच्या ऐन पंचविशीत डेव्हिड आपल्या आवडत्या अध्ययन विषयांकडे वळले. गणित, रसायनशास्त्र, खनिजविज्ञान, भूस्तरशास्त्र या ज्ञानक्षेत्रांत त्यांना विलक्षण रुची आणि गती होती. या विषयांत अवगाहन आणि वाचन करत असतानाच, वयाच्या २७व्या वर्षी, म्हणजे, इ.स. १७९९ मध्ये, ॲडम स्मिथ यांचा 'ॲन इनक्वायरी इन टू नेचर ॲन्ड कॉजेस् ऑफ द वेल्थ ऑफ नेशन्स' हा विख्यात ग्रंथ डेव्हिड रिकार्डो यांच्या हाती पडला.

आधुनिक अर्थशास्त्राचे जनक गणल्या जाणा-या ॲडम स्मिथ यांचा तो ग्रंथ वाचून रिकार्डो केवळ प्रभावित झाले एवढेच नव्हे तर ते त्याचे चाहते बनले. तत्कालीन ब्रिटनमध्ये आकारास येत असलेल्या राजकीय घडामोडींपायी राजकीय अर्थविज्ञानासंदर्भात जनसामान्यांमध्ये कुतूहल आणि जिज्ञासा वाढत होती. रिकार्डो त्या सा-या घडामोडी विचक्षणपणे न्याहाळत, अभ्यासत होते. त्यांतूनच, अर्थशास्त्रीय घडामोडींचा अभ्यास, विश्लेषण, संशोधन व लेखन यांकडे ते अवचितच वळले. तसे बघितले तर, सक्रिय अर्थशास्त्रज्ञ या नात्याने डेव्हिड यांची कारकीर्द भरते अवघ्या १४ वर्षांची. सोन्याच्या बाजारभावांसंदर्भातील डेव्हिड यांचा पहिलावहिला लेख प्रकाशित झाला तो २९ ऑगस्ट १८०९ रोजी. म्हणजे, त्या वेळी डेव्हिड यांचे वय होते ३७-३८ वर्षांचे. त्याच्या पुढच्याच वर्षी, म्हणजे, १८१० साली त्याच विषयासंदर्भातील एक माहितीपर पुस्तिका त्यांनी प्रकाशित केली. त्या पुस्तिकेमुळे मात्र रिकार्डो एकदमच प्रसिद्धीच्या झोतात आले. सोन्याच्या बाजारभावांतील वाढीची चिकित्सा करणा-या त्या पुस्तिकेचे पडसाद ब्रिटिश संसदेमध्येही उमटले. सोन्याच्या बाजारभावांतील वाढीची व त्या वाढीस कारणभूत असणा-या घटकांची चौकशी करण्याची मागणी लोकनियुक्त सदस्यांनी संसदेमध्ये उचलून धरली. त्या मागणीला प्रतिसाद देत एक चौकशी समिती नेमली गेली. सदर चौकशी समितीने सादर केलेला अहवाल प्रचंड गाजला. एक विचक्षण, प्रगल्भ व संवेदनशील अर्थवेत्ता या नात्याने डेव्हिड रिकार्डो यांची ओळख प्रस्थापित झाली ती तेव्हापासूनच. जेम्स स्टुअर्ट मिल् आणि थॉमस् माल्थस या दोन प्रतिष्ठित आणि आदरप्राप्त अर्थतज्ज्ञांशी रिकार्डो यांची जवळीक आणि पुढे यथावकाश मित्रत्वाचे नाते प्रस्थापित झाले ते याच सगळ्या घडामोडींद्वारे.

रिकार्डो यांचे नाव अर्थविज्ञानाच्या प्रांतात अजरामर बनले ते त्यांनी मांडलेल्या दोन सिद्धांतांपायी. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या संदर्भातील ‘कम्पॅरिटिव्ह कॉस्ट ॲडव्हान्टेज्’च्या प्रमेयाचे विवरण करणारा सिद्धांत पहिला. तर, खंडाच्या (रेन्ट) उपपत्तीसंदर्भातील विश्लेषण करणारा दुसरा. त्याचाही संबंध पुन्हा आंतरराष्ट्रीय व्यापाराशीच पोहोचतो.



**संधी खर्च आणि आंतरराष्ट्रीय व्यापार**

संधी खर्च (अपॉर्च्युनिटी कॉस्ट) ही अर्थशास्त्रातील एक अतिशय मूलभूत संकल्पना. माणसांच्या अमर्याद गरजा आणि त्यांच्या तुलनेत मर्यादित असणारी साधनसामग्री हे सनातन द्वंद्व लोकव्यवहाराच्या पाचवीला पुजलेले आहे. साधनसामग्री केवळ मर्यादित आहे इतकेच नव्हे तर, एकाच प्रकारच्या साधनसामग्रीचा बहुआयामी वापर करता येतो. त्यांमुळे, साहजिकच आपल्याला पदोपदी कशाची ना कशाची तरी निवड करावी लागते. अशी निवड करत असताना आपल्या प्रत्येकाच्याच मनाशी एक प्राधान्यक्रम कळत-नकळतच तयार होत असतो. प्राधान्यक्रमाच्या अशा शिरोभागी जो पर्याय आपल्या पुढ्यात असतो त्याची आपण त्या ठिकाणी निवड करत असतो. म्हणजेच, ज्या वेळी आपण प्राधान्यक्रमात प्रथम मानांकन मिळालेल्या पर्यायाची निवड करतो त्या वेळी त्या क्रमात दुस-या क्रमांकावर असलेल्या पर्यायावर आपण पाणी सोडलेले असते. म्हणजेच, एक पर्याय निवडल्यामुळे ज्या अन्य पर्यायावर पाणी सोडलेले असते अथवा सोडावे लागते त्याला, निवडलेल्या पर्यायाचा संधी खर्च (अपॉर्च्युनिटी कॉस्ट) असे अर्थशास्त्रीचा परिभाषेत म्हटले जाते. दुस-या भाषेत सांगावयाचे तर, उपलब्ध असणा-या सर्व पर्यायांमधून ज्या वेळी आपण एखादा पर्याय निवडतो त्या वेळी निवडलेल्या त्या पर्यायाच्या संधी खर्चाबाबत आपण आपल्या मनाशी काही ना काही विचार वा हिशेब मांडत असतो आणि म्हणूनच आपण त्या वेळी केलेली निवड ही तर्कशुद्ध आहे अथवा असते, असे अर्थशास्त्र मानते.

दोन देशांमध्ये केला जाणारा अथवा होणारा व्यापार हा उभय देशांना का व कसा लाभदायक ठरत असतो, याचे विश्लेषण करण्यासाठी रिकार्डो यांनी संधी खर्चाच्या याच संकल्पनेचे उपयोजन केले. परस्परांशी व्यापारी संबंध प्रस्थापित केलेल्या दोन देशांपैकी एखाद्या देशातील उत्पादन घटकांची सरासरी उत्पादकता, त्या व्यापारात समाविष्ट असलेल्या सर्वच वस्तू अथवा सेवांच्या निर्मितीमध्ये भागीदार देशाच्या तुलनेने कमी आहे म्हणून त्या देशानेच सर्व जिनसांची निर्मिती करावी हे कसे अशास्त्रीय ठरते त्याचे विवरण रिकार्डो यांनी संधी खर्चाच्या संकल्पनेद्वारे स्पष्ट केले. त्या विश्लेषणाने व्यापारविषयक चिंतनाला निर्णायक कलाटणी मिळाली.

सगळ्यांच उत्पादन घटकांची उत्पादकता सगळ्या देशांत सारखी नसते. केवळ इतकेच नाही तर, एकाच अर्थव्यवस्थेतील निरनिराळ्या उत्पादनघटकांची उत्पादकता वेगेवगळी असू शकते. एकच उत्पादन घटक अनेक वस्तू व सेवांच्या निर्मितीमध्ये वापरता येतो. त्यांमुळे, उपलब्ध असणारे उत्पादन घटक कोणत्या वस्तू अथवा सेवांच्या निर्मितीमध्ये वापरणे तुलनेने अधिक किफायतशीर ठरते, हे तपासून बघण्यासाठी रिकार्डो यांनी संधी खर्चाच्या संकल्पनेचे उपयोजन केले. त्याचबरोबर, 'स्पेशलायझेशन' (विशेषीकरण) या आणखी एका अर्थशास्त्रसंलग्न संकल्पनेचाही त्यांनी व्यापारविषयक त्यांच्या 'मॉडेल'ची रचना करण्यासाठी आधार घेतला. रिकार्डो यांचे ते प्रारूप आणि त्याचा आधार असणारे त्यांचे विवेचन नीट समजावून घ्यावे असेच आहे.

आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या मुळाशी असणारे अर्थशास्त्रीय तर्कशास्त्र समजावून सांगण्यासाठी रिकार्डो यांनी रचलेल्या प्रारूपामध्ये, वानगीदाखल, दोन देश, दोन वस्तू आणि एक उत्पादनघटक यांचा समावेश आहे. इंग्लंड आणि पोर्तुगाल हे दोन देश, वाइन आणि कापड या दोन जिनसा आणि श्रमशक्ती हा उत्पादनघटक हे सारे रिकार्डोरचित प्रारूपाचे अवयव होत. मद्य आणि कापड या दोन जिनसांचे एक एकक उत्पादन करण्यासाठी इंग्लंडमध्ये अनुक्रमे १२० आणि १०० एकक इतके मनुष्यबळ लागते. तर, याच दोन वस्तू बनवण्यासाठी पोर्तुगालमध्ये अनुक्रमे ८० आणि ९० एकक इतके मनुष्यबळ आवश्यक ठरते. वरकरणी बघितले तर मद्य आणि कापड या दोन्ही जिनसा निर्माण करण्यामध्ये इंग्लंडच्या तुलनेत पोर्तुगाल सरस दिसतो. कारण, या दोन्ही चीजांचे एक एकक उत्पादन करण्यासाठी इंग्लंडच्या तुलनेत पोर्तुगालला कमी एकक मनुष्यबळ वापरावे लागते. याचा सरधोपट अर्थ असा होतो की, पोर्तुगालनेच मद्य आणि कापडाची निर्मिती करत बसावे आणि दोन्ही जिनसा इंग्लंडला निर्यात कराव्यात. परंतु, व्यापार असा एकतर्फी होत नसतो. आयात करणा-या देशाने काहीच निर्यात केले नाही तर आयातीचे मोल चुकते करण्यासाठी तो परकीय चलन कोठून आणणार, हा साधा प्रश्न उभा राहतो. अशा परिस्थितीत, इंग्लंड आणि पोर्तुगाल यांच्यादरम्यान व्यापार घडावा तरी कसा ?



या प्रश्नाचे उत्तर रिकार्डो संधी खर्च आणि विशेषीकरण या दोन संकल्पनांच्या उपयोजनाद्वारे देतात. एक एकक मद्य निर्माण करण्यासाठी पोर्तुगालमध्ये ८० एकक इतकी श्रमशक्ती लागते. तर, एक एकक इतके कापड तयार करण्यासाठी तिथे ९० एकक इतकी श्रमशक्ती लागते. समजा, एक एकक कापड तयार करण्यासाठी लागणारे ९० एकक मनुष्यबळ पोर्तुगालने एक एकक मद्यनिर्मितीकडे वळवले तर, पाणी सोडाव्या लागलेल्या एक एकक कापडाच्या बदल्यात पोर्तुगालला १.१२५ एकक इतक्या मद्याचे उत्पादन घेता येईल. हे साधे त्रैराशिक आहे. तसेच, समजा एक एकक मद्य निर्माण करण्यासाठी आवश्यक असणारे ८० एकक इतके मनुष्यबळ पोर्तुगालने एक एकक कापड तयार करण्याकडे वळवले तर, पाणी सोडाव्या लागलेल्या एक एकक मद्याच्या बदल्यात पोर्तुगालला ०.८९ एकक इतके कापड पदरात पडेल. संधी खर्चाची परिभाषा वापरून हेच सांगायचे झाले तर आपल्याला असे म्हणावे लागेल की, एक एकक कापडाचा, पाणी सोडाव्या लागलेल्या मद्याच्या रूपातील संधी खर्च पोर्तुगालमध्ये १.१२५ एकक मद्य इतका आहे. तर, एक एकक मद्याचा पाणी सोडाव्या लागलेल्या कापडाच्या रूपातील संधी खर्च पोर्तुगालमध्ये ०.८९ एकक कापड असा आहे.

तिकडे इंग्लंडमध्ये काय चित्र आहे, ते आता बघू. एक एकक मद्य आणि कापड तयार करण्यासाठी इंग्लंडला अनुक्रमे १२० एकक आणि १०० एकक इतके मनुष्यबळ लागते. समजा, एक एकक मद्य निर्माण करण्यासाठी आवश्यक भासणारे १२० एकक इतके मनुष्यबळ इंग्लंडने एक एकक कापड तयार करण्याकडे वळवले तर, पाणी सोडाव्या लागलेल्या एक एकक मद्याच्या बदल्यात इंग्लंडला १.२ एकक इतके कापड निर्माण करता येईल. एक एकक कापड तयार करण्यासाठी आवश्यक असणारे १०० एकक इतके मनुष्यबळ, समजा, इंग्लंडने एक एकक मद्य निर्माण करण्याकडे वळवले तर, पाणी सोडाव्या लागलेल्या एक एकक कापडाच्या बदल्यात इंग्लंडला ०.८३ एकक इतके मद्य उत्पादन करता येईल. म्हणजेच, एक एकक कापडाचा संधी खर्च इंग्लंडमध्ये ०.८३ मद्य असा आहे तर, एक एकक मद्याचा संधी खर्च तिथे १.२ एकक कापड इतका भरतो.

## विशेषीकरण, खुला व्यापार आणि खंड

आता, हे बघण्यासारखे आहे. एक एकक कापडाचा संधी खर्च पोर्तुगालमध्ये १.१२५ एकक मद्य इतका आहे. तर, एक एकक मद्याचा संधी खर्च तिथे ०.८९ एकक कापड इतका आहे. म्हणजेच, पोर्तुगालचा विचार करता, कापडाचा मद्याच्या स्वरूपातील संधी खर्च (१.१२५ एकक मद्य) हा मद्याच्या (पाणी सोडाव्या लागलेल्या कापडाच्या ०.८९ एकक) संधी खर्चापेक्षा अधिक आहे. रिकार्डो यांच्या प्रतिपादनानुसार, देशी अर्थव्यवस्थेत ज्या जिनसाचा संधी खर्च कमी त्या जिनसाच्या उत्पादनामध्ये संबंधित देशाने विशेषीकरण साधावे. म्हणजेच, या उदाहरणामध्ये पोर्तुगालने मद्याच्या निर्मितीमध्ये विशेषीकरण साध्य करावे. याच न्यायाने, इंग्लंडच्या अर्थव्यवस्थेचा विचार करता, एक एकक कापडाचा (पाणी सोडणे भाग पडलेल्या मद्याच्या स्वरूपातील ०.८३ एकक मद्य इतका) संधी खर्च हा, एक एकक मद्याच्या (पाणी सोडाव्या लागलेल्या १.२ एकक कापडाच्या रूपातील) संधी खर्चापेक्षा कमी आहे. त्यांमुळे, इंग्लंडने कापडाच्या उत्पादनामध्ये विशेषीकरण साधावे.

या सगळ्या घडामोडींच्याच आगेमागे जमीनदारांच्या ओंजळीत खंडाच्या रूपाने पडणाऱ्या अनर्जित उत्पन्नाचे जे विश्लेषण रिकार्डो यांनी मांडले त्यांमुळेही तत्कालीन ब्रिटनमध्ये राजकीय पडसाद उमटण्याबरोबरच आर्थिक हितसंबंधांची फेरजुळणीही घडून आली. व्यापाराची उपपत्ती सांगणारे रिकार्डो यांचे प्रमेय आणि खंडासंदर्भातील त्यांचे विवेचन या दोहोंमधून देशादेशांदरम्यानच्या खुल्या, मुक्त व्यापाराचे समर्थन करणारे विचारविश्व अर्थचिंतनाच्या प्रांतात स्थिरावले व प्रतिष्ठित बनले. आजच्या आपल्या परिचित भाषाव्यवहारात दुसऱ्याला कसायला दिलेल्या जमिनीखातर मूळ मालकाला, प्रत्यक्षात शेती कसणारा शेतकरी जो मोबदला अदा करतो त्याला आपण 'खंड' असे म्हणतो. 'शेती खंडाने करायला दिलेली आहे', असे जे म्हटले जाते ते याच अर्थाने. 'खंड' या आर्थिक संकल्पनेचा मूळ अर्थ अगदी सोपा आहे. कोणत्याही उत्पादन घटकाच्या वापरासाठी त्याच्या पुरवठादाराला जो मोबदला अदा करावा लागतो त्याला 'खंड' असे म्हणतात. डेव्हिड रिकार्डो यांनी खंडाच्या या मूळ संकल्पनेचा आणखी एक प्रगल्भ आयाम अर्थविश्वात प्रतिष्ठित केला.



ज्या वेळी कोणत्याही उत्पादन घटकाचा पुरवठा व्यवहारात (तात्पुरता अथवा कायमचा) पूर्णपणे अ-लवचीक असतो अशा वेळी त्या उत्पादन घटकाच्या मालकाला आणि/अथवा पुरवठादाराला त्याचा जो मोबदला मिळतो त्यास 'आर्थिक खंड' (इकॉनॉमिक खंड) असे संबोधावे, असे रिकार्डो यांचे प्रतिपादन होते. जमिनीच्या वापराबाबत जो मोबदला तिच्या मालकाला मिळत राहतो तो वास्तवात 'भूमी' नावाच्या उत्पादन घटकाच्या ठायी वसणाऱ्या अजोड, अभेद्य, अविनाशी अशा एका गुणधर्मापायी मिळत असतो, असे स्पष्टीकरण रिकार्डो यांनी मांडले. जमिनीचा पुरवठा हा अ-लवचीक असतो हा तिच्या ठायीचा अविनाशी, अजोड गुण वा भूमीचे अद्वितीय सामर्थ्य होय, असा रिकार्डो यांचा युक्तिवाद. कोणत्याही उत्पादन घटकाचे बाजारभावांमधील चढउतार जेव्हा त्या उत्पादन घटकाच्या उपलब्धतेबाबत आणि/अथवा पुरवठ्याबाबत पूर्णपणे असंवेदनशील असतात त्या वेळी, अशा त्या उत्पादनघटकाला मिळणाऱ्या मोबदल्याला 'आर्थिक खंड' असे संबोधावे, असे प्रतिपादन रिकार्डो यांनी केले. रिकार्डो यांच्या त्या सगळ्या प्रतिपादनाचा संबंध ब्रिटनमधील तत्कालीन शेतीव्यवहार आणि त्यांत गुंतलेल्या जमीनदारांना मिळणाऱ्या खंडाच्या वास्तवाशी गुंफलेला होता. खंडाच्या उत्पत्तीविषयकचे ते विश्लेषण रिकार्डो यांनी त्यांच्या ग्रंथात शब्दबद्ध केल्यानंतरच्या उण्यापुऱ्या तीन दशकांच्या काळातच ब्रिटनमध्ये जणू काही आर्थिक क्रांती वा स्थित्यंतरच घडून आले. तत्कालीन ब्रिटिश समाजातील हितसंबंधांची फेरमांडणीही त्यांद्वारे तिथे साकारली.

तत्कालीन ब्रिटिश समाजव्यवस्थेमध्ये जमीनदार हा सर्वांत बलशाली वर्ग होता. सर्व प्रकारची अधिसत्ता त्याच्याच हातात एकवटलेली. जमिनींद्वारे मिळणारा बख्खळ खंड हेच या वर्गाचे उत्पन्नाचे हुकुमी साधन. या जमीनदार वर्गाला मिळणारा घसघशीत खंड हा त्यांची क्षमता वा त्यांनी जमीनसुधारणांसाठी केलेल्या गुंतवणुकीवरील परतावा नसून तो मक्याच्या बाजारभावांतील तेजीचा परिणाम होय आणि मक्याच्या बाजारभावांतील ती तेजी कसदार जमिनीच्या अ-लवचीक पुरवठ्यामुळे निर्माण होते आहे, हे रिकार्डो यांनी स्पष्ट केले. म्हणजेच, जमीनदारांना मिळणारा खंड हा अनर्जित वाढावा (सरप्लस) होय, असा युक्तिवाद रिकार्डो यांनी मांडला.

मका हे त्या काळातील एक प्रमुख खाद्यान्न. ब्रिटनमधील लोकसंख्या जसजशी वाढू लागली तसतशी मक्याची मागणीही स्वाभाविकपणे वाढू लागली. वाढत्या मागणीचे प्रतिबिंब बाजारपेठेत मक्याच्या बाजारभावांमधील चढत्या भाजणीच्या रू पाने दिसू लागले. त्यांतून मक्याच्या लागवडीला प्रोत्साहन मिळाले. चांगल्या कसदार जमिनी मक्याच्या लागवडीखाली येऊ लागल्या. अशा जमिनींच्या मालकांना खंडही चांगला मिळायला लागला. लोकसंख्या वाढ होतच राहते आणि राहिली. त्यांतून मक्याच्या मागणीची कमानही चढतीच राहिली. मक्याचे बाजारभावही चढेच राहिले. पुरवठा वाढवण्यासाठी, मग, अधिकाधिक जमिनी मक्याच्या लागवडीखाली आणण्यास सुरु वात झाली. चांगल्या, पहिल्या प्रतीच्या, कसदार जमिनी मक्याच्या लागवडीने व्यापल्यानंतर तुलनेने हिणकस जमिनींवर मक्याची लागवड चालू करण्यात आली. अशा जमिनींचा पोत हलका असल्याने मक्याचे त्या जमिनींवरील दर एकक उत्पादन (म्हणजेच, मक्याची उत्पादकता) अस्सल, उपजाऊ जमिनींच्या तुलनेत कमी होते. दुस-या भाषेत सांगायचे तर, कमअस्सल जमिनींवरील मक्याचा दर एकक उत्पादन खर्च हा उपजाऊ जमिनींवरील दर एकक उत्पादन खर्चापेक्षा अधिक होता. तिकडे बाजारपेठेतील मागणी वाढतच होती. या सगळ्या अशा समीकरणामुळे मक्याचे बाजारभाव चढू लागले. साहजिकच, कसदार व उत्तम प्रतीच्या उपजाऊ जमिनींना खंडाच्या रूपाने मिळणारा मोबदला वाढू लागला. पर्यायाने, काहीही विशेष श्रम, जमीनसुधारणा वा वाढीव गुंतवणूक न करताच जमीनदार वर्गाचे उत्पन्न ब्रिटनमध्ये वाढू लागले. पहिल्या प्रतीच्या जमिनींचा पुरवठा कायमच अ-लवचीक राहिल्याने अशा जमिनींच्या मालकांचे खंडाद्वारे मिळणारे उत्पन्न मक्याच्या बाजारभावांतील तेजीपायी वाढत राहिले. त्यालाच, रिकार्डो यांनी जमीनदारांचा 'अनर्जित वाढावा' (अन्अर्न्ड सर्प्लस) असे संबोधले.

ज्या जिनसांच्या उत्पादनाचा संधी खर्च अधिक अशी उत्पादने व्यापाराद्वारे आयात करणे हे अधिक सुज्ञपणाचे ठरते, हे प्रमेय आणि जमीनदारांच्या अनर्जित वाढाव्यासंदर्भातील विश्लेषण या रिकार्डो यांच्या दोन प्रतिपादनांमुळे ब्रिटनमध्ये १९व्या शतकाच्या मध्यास एक मोठी आणि मूलभूत अशी राजकीय चळवळ उगम पावली.



मक्याच्या आयातीवर तत्कालीन ब्रिटनमध्ये मर्यादा होत्या. ब्रिटिश बाजारपेठांमध्ये मक्याचे बाजारभाव एका विशिष्ट पातळीपेक्षा अधिक वर गेल्याखेरीज आयातीला परवानगी नसे. मक्याचे बाजारभाव चढायला लागले की कामगारांकडून पगारवाढीची मागणी केली जाई. कारण, मका हे तर मुख्य खाद्यान्न. कामगारांचा मोबदला वाढवून दिला की कारखानदारांच्या नफाप्रदतेवर आच येई. मग, मक्याच्या आयातीवर मर्यादा घालणारे कायदेकानू बदलावेत यासाठी ब्रिटिश भांडवलदारांनी चळवळ चालू केली. मक्याच्या आयातीद्वारे मक्याचे ब्रिटिश बाजारपेठेतील बाजारभाव नेमस्त व वाजवी राहणार असल्याने ब्रिटिश कामगारवर्गालाही आयातीचे लाभ पटलेले होते. त्यांमुळे, मक्याच्या आयातीवरील निर्बंध वा मर्यादा जारी करणा-या कायद्यांविरु द्ध ब्रिटिश कारखानदारांनी चालवलेल्या चळवळीला ब्रिटिश कामगारांचाही पाठिंबा मिळाला. वास्तविक पाहता, तत्कालीन व्यवस्थेमध्ये जमीनदार वर्ग हा राजकीयदृष्ट्या बलदंड होता. परंतु, मक्याच्या आयातीवरील निर्बंध हटवण्याची मागणी करणा-या लोकचळवळीचा आवाज बुलंद बनला. चळवळीची सरशी झाली...आणि या सगळ्या सव्यापसव्यातून ब्रिटिश भांडवलशाही खुल्या, मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापाराची खंदी समर्थक बनली.

औद्योगीक क्रांतीच्या आघाडीवर ब्रिटनने साधलेली कमाई आणि सागरी दळणवळणाद्वारे प्रस्थापित केलेले साम्राज्य या दोहोंला वैचारिक अधिष्ठान पुरवणा-या रिकार्डो यांच्या या प्रगल्भ अर्थचिंतनाने मुक्त, खुल्या जागतिक वा आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांताला व्यावहारिक प्रतिष्ठा प्राप्त करू न दिली. औद्योगीक विकासाच्याबाबतीत गरु डझेप घेतलेल्या ब्रिटनने खुल्या व्यापाराच्या तत्त्वज्ञानाची तळी हिरिरीने उचलली व राबवलीही. यथावकाश, युरोपातील अन्य देशांनी, खास करू न जर्मनीने, खुल्या व्यापाराचे तत्त्वज्ञान सार्वत्रिक हिताचे संगोपन करणारे नाही तसेच ते सार्वत्रिक लागूही होत नाही, अशी तक्रार चालू केली. ब्रिटनच्या राष्ट्रीय हिताचे संवर्धन करणा-या तत्त्वप्रणालीला सार्वत्रिक सत्य म्हणून उद्घोषण्याचा हा कावा आहे, असा आवाज मग उठायला लागला. खुल्या व्यापाराचे आर्थिक अधिष्ठान आणि त्याला मिळणारा राजकीय प्रतिसाद यांच्यातील द्वंद्वाचे बीज आहे ते नेमके या ठिकाणीच. आजही तेच घडते आहे. ●●

राजकारण

# राष्ट्रवादाच्या आकर्षणामागील अर्थवास्तव

स्वभाव परस्परांच्या अगदी विरुद्ध, वेगवेगळे असले तरी राजकारण आणि अर्थकारण यांचे नाते अतिशय जवळचे आहे आणि असते. अर्थकारणाला राजकारणाचा हात सोडता येत नसतो आणि कोणताही राजकीय निर्णय घेत असताना त्या निर्णयाच्या संभाव्य आर्थिक परिणामांकडे काणाडोळा करणे हे कोणत्याही सुज्ञ राजकीय धुरीणाला परवडणारे नसते. कारण, अर्थकारण काय वा राजकारण काय, या दोहोंची नाळ जुळलेली असते ती समाजकारणाशी. प्रचलीत अर्थवास्तवाचे भलेबुरे परिणाम समाजावर होत राहतात. समाज कधीच एकसंध नसतो. कोणत्याही समाजात स्तरीकरण जितके बहुविध आणि गुंतागुंतीचे तितकेच सरकारच्या एखाद्या आर्थिक निर्णयाचे अथवा धोरणाचे व्यवहारातील परिणाम बहुमिती आणि बरेचदा ठाम ठोकताळे बांधता न येण्याजोगे ठरतात. समाजातील विवधता वा व्यामिश्रता जितकी अधिक तितकी ख-या अर्थाने सर्वसमावेशक विकासाचे धोरण आखण्याच्याबाबतीतील क्लिष्टता अधिक. राजकीय व्यवस्थेतील धुरीणांचा खरा कस लागतो तो अशा गुंतागुंतीच्या समाजव्यवस्थेतील आर्थिक धोरण आखताना.

जगाच्या वेगवेगळ्या भागात वाढीस लागत असलेल्या राष्ट्रवादाच्या आकर्षणामागील आणि त्या आकर्षणाच्या लाटेवर स्वार होऊबघत असलेल्या राजकीय वृत्तिप्रवृत्तींच्या मुळाशी असलेल्या कारणपरंपरेचे आकलन करून घेत असताना, 'अर्थकारण-समाजकारण-राजकारण' या मानवी व्यवहारांच्या तीन अंगांदरम्यान नांदणा-या नात्याचा पोत नीट न्याहाळणे गरजेचे ठरते ते यापायीच. देशोदेशी मूळ धरत असलेल्या राष्ट्रवादाच्या या आकर्षणाबाबत जगभरातील विचारवंतांमधील विचारविमर्शाला चालना मिळाली ती अलीकडील काळातील दोन घटनांपायी. युरोपीय समुदायातून बाहेर निघण्याचा ब्रिटनचा निर्णय आणि डोनल्ड ट्रम्प यांची अमेरिकी राष्ट्राध्यक्षपदी झालेली निवड, या त्या, उभ्या वैश्विक राजकारणाला कलाटणी देणा-या, दोन घटना.



उदारमतवादी अर्थकारण, अर्थसंस्कृती आणि तिच्या आधारे नांदणा-या व्यवस्थांचा अंमल, साधारणपणे १९८०च्या दशकाच्या आगेमागे एकंदरीने सर्व जगातच स्थिरावू लागला. उदारमतवादी अशा या अर्थसंस्कृतीचे आणि तिची तळी उचलून धरणा-या व्यवस्थात्मक, संस्थात्मक तसेच वैचारिक ढाचाचे मुख्य पैलू प्रथम नीट समजावून घ्यायला हवेत. अलीकडे अनुभवास येत असलेल्या राष्ट्रवादपूरक विचारसरणीच्या उत्थानामागील कार्यकारणभावाचे स्पष्टीकरण त्यांखेरीज होणार नाही. कोणत्याही देशातील नागरिकांसंदर्भात विश्वबंधुत्वाची जाणीव रुजवणे अथवा मान्य करणे, हे या उदार अर्थदृष्टीचे पहिले द्योतक. आपण सगळेच वैश्विक समुदायाचे घटक आहोत आणि म्हणून लौकिकदृष्ट्या आपण कोणत्याही राष्ट्राचे रहिवासी असलो तरी स्वरूपतः आपण विश्वनागरिक आहोत, ही भावना इथे केंद्रभूत ठरते. उदारमतवादी अर्थदृष्टी ही तिच्या नावाप्रमाणेच सोशीक, उदार, वर्ण-वंश-लिंगभावाधारित भेदभावांना खतपाणी न घालणारी अशीच असते. खुल्या बाजारपेठीय अर्थकारणाच्या नियमांनुसार चालणा-या अर्थव्यवहारांवर तिची मदार राहते. परंतु, खुल्या बाजारपेठेवरील रास्त, उचित अशा नियमनांची निकड तिला पटलेली असते. खुल्या अर्थव्यवहारांना मोकळीक बहाल करणारी ही अर्थदृष्टी, साहजिकच, देशादेशांदरम्यान चालणा-या तसेच वाढत असलेल्या मुक्त व्यापाराचा पुरस्कार करते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेद्वारे वैश्विक समूहाला शांती आणि समृद्धीचा लाभ होतो आहे, अशी उदार अर्थव्यवहारांची पाठराखण करणा-या या विचारसरणीची धारणा सततच राहिलेली आहे.

खुल्या, उदार अर्थव्यवहारपूरक संस्कृतीने केलेल्या निराशेपायी संकुचित, आत्ममग्न अशा राष्ट्रवादपूरक मानसिकतेला अनुकूल भूमी लाभते आहे आणि 'ब्रेग्झिट' व ट्रम्प यांची सरशी ही त्याच मानसिकतेची दोन दृश्य प्रतीके होत, अशा प्रकारचे एक विश्लेषण, या सगळ्या पार्श्वभूमीवर, आताशा मांडले जाते. ब्रिटनस्थित विख्यात अर्थतज्ज्ञ लॉर्ड मेघनाद देसाई यांच्यासारख्या प्रगल्भ समाजाभ्यासकाने या सगळ्या प्रक्रियेसंदर्भात मांडलेले विवेचन समजावून घेणे म्हणूनच उपयुक्त व संयुक्तिक ठरावे. राष्ट्रवादाच्या आकर्षणामागील अर्थवास्तवाचे देसाईकृत विश्लेषण अत्यंत अर्थगर्भ आहे.

## तीन मुख्य कारणे

जगाच्या विकसित देशांच्या पट्ट्यातील काही देशांमध्ये अलीकडील काही वर्षांत तेथील राजकीय विश्वात काही नवीन राजकीय प्रवृत्तींचा उदय होत असल्याचे दिसून येते. विचारसरणीच्या उजव्या अगर डाव्या टोकावर उभे असणारे राजकीय पक्ष काही विकसित देशांतील राजकीय प्रवाहामध्ये उगम पावत आहेत. तसे बघितले तर त्या त्या देशातील राजकीय संस्कृतीच्या मध्य व मुख्य प्रवाहात हे पक्ष नाहीत. त्या त्या देशातील राजकीय संस्कृतीच्या झालर क्षेत्रांतच आजघडीला ते सक्रिय दिसतात. गेली सुमारे चार ते साडेचार दशके ज्या प्रकारचे अर्थकारण जागतिक अर्थपटलावर उत्क्रांत झालेले आहे त्या अर्थकारणाबाबतची नाराजी, नैराश्य, असमाधान यांची निष्पत्ती म्हणजे हे असे टोकाची विचारसरणी जोपासणारे राजकीय पक्ष होत, असे राजकीय पक्षसंस्कृतीच्या अभ्यासकांचे विश्लेषण आहे. उदारमतवादी, खुले बाजारपेठीय अर्थकारण, मुक्त जागतिक व्यापार अशा प्रणालींची तळी उचलून धरणारी राजकीय व्यवस्था, संस्था व संस्कृती यांबाबत समाजाच्या विविध स्तरांत नांदणारी नफरत या अशा टोकावरील विचारसरणीच्या राजकीय पक्षांच्या उगम व विस्तारास वाव मिळवून देतात, असेही राजकीय संस्कृतींच्या पंडितांचे प्रतिपादन आहे.

वैश्विक समूहाच्या काही स्तरांतील जनसमूहांमध्ये वसणा-या अशा नफरतीचे कारण प्रचलीत अर्थवास्तवातच दडलेले आहे. उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या माध्यमातून उमलणा-या सशक्त आर्थिक प्रगतीचे लाभ मिळण्यास पूरक ठरणा-या वास्तवाचे आकर्षण व आवाहन अलीकडे एकंदरीनेच उतरणीला लागलेले आहे, असे स्पष्टीकरण या संदर्भात दिले जाते. खुल्या बाजारपेठा, उदार अशी आर्थिक विकासाची धोरणे, सरकारच्या वित्तीय तुटीचे नियंत्रण करण्याबाबत कटाक्ष राखणा-या वित्तीय शिस्तीच्या पालनाबाबतचा आग्रह आणि महागाईवर अंकुश राखण्याबाबत सजग असलेल्या पैसाधोरणाचा अवलंब असे सारे अर्थवास्तव, उदारमतवादी अर्थविषयक धोरणांच्या लाभांचे अवतरण व्यवहारात होण्यासाठी आवश्यक व पूरक ठरते, या युक्तिवादाचे आवाहन आता वेगाने उतरणीला लागलेले दिसते. त्यांमागील कारणमालिका तिहेरी आहे.



गेली सुमारे साडेचार दशके जगाच्या विविध देशांत स्थिरावलेल्या उदारमतवादी अर्थसंस्कृतीला छेद देणा-या आत्मकेंद्री, संकुचित जीवनदृष्टीच्या राष्ट्रवादपूरक संस्कृतीबाबतचे आकर्षण वाढीस लागण्यास अलीकडील काळातील तीन घटना मुख्यत्वे कारणभूत आहेत, असे अभ्यासकांचे प्रतिपादन सांगते. अमेरिकी अर्थव्यवस्थेमध्ये २००८ सालातील सप्टेंबर महिन्याच्या मध्यावर झालेला ‘सब्प्राइम’ कर्जाच्या फुग्याचा विस्फोट, हे झाले त्यांतील पहिले कारण. त्या दणक्यामुळे अमेरिकेसह युरोपीय समुदायातील काही देशांमधील बँका कमालीच्या अडचणीत आल्या. बँकांचा भांडवली पाया खचला. तो सावरण्यासाठी त्या त्या देशांच्या सरकारांना भरभक्कम अर्थसाह्याचे ‘इंजेक्शन’ बँकांना टोचावे लागले. परिणामी, सरकारांची वित्तीय तूट फुगली. तूट भरून काढण्याचे आव्हान पुढ्यात असल्याने कल्याणकारी योजनांवरील सरकारी खर्चाला कात्री लावण्याखेरीज पर्याय उरला नाही. या सगळ्यांपायी विकसित अर्थव्यवस्थांमधील बेरोजगारी वाढली. सरकारपासून ते खासगी क्षेत्रापर्यंत सगळ्यांच्याच माथ्यावर जुन्या कर्जांचा बोजा चढलेला असल्याने नवीन कर्जांना मागणी येईना. उद्योग ठप्प झाले. यामुळे सर्वसामान्य नोकरदार जेरीस आले. युरोपीय समुदायातील देशांपुढील अडचणींत अधिकच भर पडली ती सीरियातील अशांततेमुळे तिथून बाहेर पडून आश्रयास येणा-या स्थलांतरितांच्या लोंढ्यांपायी. स्थलांतरितांना सामावून घेण्याचा अतिरिक्त आर्थिक भार सरकारच्या तिजोरीवर वाढायला लागला. स्थलांतरितांपायी स्थानिकांच्या नोक-यांवर व रोजगारसंधींवर दावेदार निर्माण झाले. मुख्य म्हणजे, बाहेरून आलेले स्थलांतरित वर्णवंशदृष्ट्या भिन्न असल्याने अनेक युरोपीय देशांमधील सामाजिक-वांशिक एकसंधतेला भेगा पडायला लागल्या. हे जणू कमी नव्हते म्हणून की काय, इस्लामी दहशतवादाच्या विस्तारणा-या सावटापायी बाहेरून येणा-या स्थलांतरितांची धार्मिक पार्श्वभूमी व धर्मश्रद्धा हाही एक संवेदनशील प्रश्न बनला. या प्रश्नाबाबत ट्रम्प आजही इस्लामी राष्ट्रांमधून येणा-या स्थलांतरितांवर पाबंदी जारी करण्याचा मुद्दा लावून धरताना दिसतात. डोनल्ड ट्रम्प यांच्या राजकीय उत्थानाच्या मुळाशी असलेली कार्यकारणपरंपरा अशी तिहेरी दिसते.

अमेरिकेसह एकंदरच विकसित देशांमध्ये मूळ धरणारे राष्ट्रवादाचे आकर्षण ही या सगळ्याचीच परिणती. म्हणजेच, अर्थकारण आणि धर्मकारण यांची बेमालूम मिसळण या सगळ्यांत दिसते. निवडून आल्यानंतर मेक्सिको आणि अमेरिकेच्या सीमेवर प्रतिबंधात्मक भिंत उभारण्याबाबत ट्रम्प यांनी निवडणूक प्रचारादरम्यान केलेले ऐलान; आणि, अमेरिकेमध्ये येऊपाहणा-या मुस्लिम स्थलांतरितांना पाबंदी करण्याबाबत निवडून आल्यानंतर त्यांनी जारी केलेले आदेश या दोन बाबी याचेच पुरावे ठरतात. राष्ट्रवादाच्या आकर्षणाचा जो प्रवाह अलीकडील काळात बळकट होताना दिसतो त्याचे आवाहन समजून घेण्यासाठी या सगळ्या घडामोडींच्या मुळाशी असलेले अर्थवास्तव जाणून घ्यायला हवे. इथे मुद्दा केवळ ट्रम्प यांच्या अमेरिकेच्या अध्यक्षपदी झालेल्या निवडीचा नाही. तर, खुल्या, उदारमतवादी अर्थकारणाला छेद देण्यास उद्युक्त झालेल्या राष्ट्रवादाभिमानी राजकीय विचारप्रणालीच्या विस्तार-प्रसाराला अनुकूल भूमी तयार करणा-या अर्थवास्तवाचे कंगोरे समजावून घेण्याचा आहे. अमेरिकी मतदारांनी आपल्या मताचा कौल ट्रम्प यांच्या पारड्यात टाकणे, ही घटना प्रातिनिधिक ठरते ती तेवढ्यासाठीच.

राजकीय निरीक्षकांच्या मते, ट्रम्प यांची अमेरिकी अध्यक्षपदाच्या निवडणुकीमध्ये झालेली सरशी म्हणजे विखंडित अमेरिकी जनमानसाचा मताविष्कार ठरला. त्यांत अंतःस्थ पदर राहिला तो वर्णभेदाचा. शैक्षणिक पात्रतेनुसारचे स्तरीकरण हा होता त्याचा दुसरा पदर. 'ग्रामीण' विरुद्ध 'शहरी' हे त्या खंडित मानसिकतेचे होते तिसरे परिमाण. तर, अमेरिकेच्या पूर्व तसेच पश्चिम किनारपट्टीवरील समृद्ध राज्ये विरुद्ध आर्थिक कुंठिततेने ग्रासलेली मध्य अमेरिकेतील वंचित राज्ये हा त्या सुप्त विसंवादाचा होता चौथा कोन. बराक ओबामा यांच्या अध्यक्षपदाची कारकीर्द वर्णशुद्धतेबाबत संवेदनशील असणा-या अमेरिकी जनसमूहांना खुपलेलीच होती. अमेरिकेच्या सत्तेवर गौरवर्णीयांची मोहोर उमटणे, ही बाब गौरवर्णीय समूहांना त्यांच्या वांशिक अधिसत्तेचा भागच वाटत असे. अमेरिकी अर्थव्यवस्थेमध्ये स्थिरावलेल्या उदारमतवादी अर्थदृष्टीच्या लाभांपासून वंचित राहिलेल्या जनसमूहांच्या मनातील रोष, नाराजी व खळबळ अचूक हेरून तिचा वापर निवडणुकीदरम्यान अस्त्रासारखा केला तो ट्रम्प यांनी.



अमेरिकी राजकीय संस्कृती आणि पक्षप्रणाली यांनी तेथवर उपेक्षित राखलेल्या मतदारांकडे ट्रम्प यांनी प्रचारादरम्यान आपला मोहरा फिरवला. अशा वंचित आणि त्यांमुळे नाराज असलेल्या समूहांमध्ये मुख्य भरणा होता तो अमेरिकी अर्थव्यवस्थेतील गौरवर्णीय श्रमिक कामगारांचा. आर्थिक विकासाच्या खुल्या धोरणाबाबत या वर्गामध्ये कमालीचे असमाधान नांदत होते. १९९०च्या दशकापासून जागतिक स्तरावर वेगाने आगेकूच करणा-या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेद्वारे निर्माण झालेल्या नवसमृद्धीचे दान या समाजघटकाच्या पदरात पुरेसे न पडल्याने तो असंतुष्ट व असमाधानी होता, असे विश्लेषण काही निरीक्षकांनी मांडलेले आहे. परंतु, काही अभ्यासकांच्या मते अमेरिकी गौरवर्णीय कामगारांच्या मानसिक असंतुष्टतेचे कारण शोधावे लागते ते थेट १९७०च्या दशकाच्या मध्यात. म्हणजेच, आजपासून जवळपास ४५ वर्षांपूर्वी. अमेरिकी अर्थव्यवस्थेत तोवर टिकून राहिलेले वस्तुनिर्माण उद्योगाचे महत्त्व, वैभव आणि वर्चस्व १९७०च्या दशकाच्या मध्यापासून उतरणीला लागले. तांत्रिक परिभाषेत 'डी-इंडस्ट्रिअलायझेशन' असे या प्रक्रियेचे वर्णन केले जाते. अमेरिकी वस्तुनिर्माण उद्योगक्षेत्राला ओहोटी लागली आणि गौरवर्णीय कामगारांच्या वर्गाचे नष्टचर्य सुरू झाले. कामगारांच्या या वर्गाच्या वास्तव वेतनातील वाढ तेव्हापासून जवळपास खुरटलेली-कुंठलेलीच आहे. १९७१ ते २०१५ या जवळपास साडेचार दशकांच्या कालावधीदरम्यान सर्वसाधारण अमेरिकी नागरिकाच्या दरडोई वेतनात लक्षणीय वाढ घडून आलेली असली तरी, अमेरिकी ठोकळ उत्पादितामध्ये (ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट - जीडीपी) वेतनाचा असणारा तौलनिक हिस्सा ५० टक्क्यांवरून घसरून ४२.५ टक्क्यांवर आला. गंमतीची म्हणा वा विस्मयाची बाब म्हणा, अमेरिकी राजकीय व्यवस्थेतील एकाही घटकाने या वास्तवाची उचित अशी दखल घेतली नाही. अमेरिकी कामगारांच्या वास्तव वेतनातील कुंठित वाढ हा एकाही अमेरिकी अर्थतज्ज्ञाने राष्ट्रीय राजकारणातील ज्वलंत प्रश्न बनवला नाही. अमेरिकी समाजव्यवस्थेतील कृष्णवर्णीय कर्मचारी आणि गौरवर्णीय अमेरिकी स्त्री कामगार यांचा इथे साधा निर्देशही कोणी करत नाही, ही बाबही या ठिकाणी अधोरेखित करावयास हवी.

**वंचना आणि उपेक्षेची दाहक जाणीव**

अमेरिकी जीवनदृष्टी आत्मनिर्भरतेवर कटाक्ष राखणारी आहे. परंतु, खुल्या बाजारपेठीय अर्थकारणात पिछाडीवर पडलेल्या अगर पडणा-या समाजसमूहांच्या सक्षमीकरणाकडे कोणत्याच सरकारी यंत्रणेने आजवर पुरेसे लक्ष पुरवलेले नाही. औद्योगिकदृष्ट्या पीछेहाट असलेल्या राज्यांकडे वस्तुनिर्माण उद्योग वळवणे आणि/अगर औद्योगिक पुनर्रचनेदरम्यान रोजगार गमावलेल्या कर्मचा-यांची रोजगारक्षमता पुन्हा नव्याने सावरण्यासाठी त्यांना उचित असे नवशिक्षण-प्रशिक्षण देण्यासाठी स्वतंत्र निधीची तरतूद करणे अशांसारख्या उपायांकडे सरसहा दुर्लक्ष केले जात राहिले. तंत्रज्ञान हे सतत बदलत राहते. आता तर तांत्रिक प्रगतीचा वेग प्रचंड वाढलेला आहे. औद्योगिक उत्पादनप्रक्रियेमध्ये वापरलेले तंत्रज्ञान बदलले की अधिक प्रगत तंत्रज्ञान हाताळू शकणा-या कुशल हातांची गरज उद्योगांना भासते. त्यासाठी कामगारांच्या पुनर्प्रशिक्षणाची व्यवस्थात्मक यंत्रणा अर्थउद्योगांच्या विश्वात निर्माण करणे गरजेचे ठरते. केवळ नवीन तंत्रज्ञान हाताळता येत नाही या एकाच कारणास्तव रोजगार गमावण्याची अगतिकता भाळी आलेल्या कामगारांचा श्रमदलातील पुनर्प्रवेश नवतंत्रज्ञानाशी सुसंगत व सुसंवादी असणा-या पुनर्प्रशिक्षणाद्वारे शक्य बनतो. अमेरिकेमधील अलीकडच्या काळातील एकाही सरकारने कामगारांच्या पुनर्शिक्षण-प्रशिक्षणासाठी खास निधीची तरतूद केलेली दिसली नाही. स्पर्धेवर बेतलेली खुली बाजारपेठीय अर्थव्यवस्था सर्व बाबींची काळजी घेईल, सगळ्या बाबी ठीकठाक करेल, ही धारणा या मनोवृत्तीच्या मुळाशी होती.

साधारणपणे, १९७०च्या दशकाच्या मध्यास अमेरिकी अर्थव्यवस्था वस्तुनिर्माण उद्योगाकडून सेवाउद्योगाकडे वेगाने झुकायला लागली. त्याच वेळी, वस्तुनिर्माण उद्योगामध्ये अत्यंत उच्च दर्जाच्या, अद्ययावत उत्पादन यंत्रतंत्रप्रणालीचा अंगीकार करण्याची लाट आली. असे अद्ययावत उत्पादन तंत्र हाताळू शकणा-या कुशल, उच्च शिक्षित-प्रशिक्षित कामगारांनाच साहजिकपणे तिथे रोजगार उपलब्ध होणे, हे मग ओघानेच आले. अशा कामगारांना मग आपसूकच भरीव मेहेनताना मिळू लागला. त्यांच्या वेतनातील वार्षिक सरासरी वाढही तशीच भरभक्कम असे.



आर्थिक प्रगतीचा आणि तिच्यातून निपजणा-या आर्थिक सुबत्तेचा हा सारा लखलखाट अमेरिकेच्या पूर्व तसेच पश्चिम किनारट्टीवरील शहरांमध्येच काय तो एकवटलेला होता. मध्य अमेरिकेतील शहरे त्या झगमगाटापासून दूरच होती. त्या सा-या भूप्रदेशांतील कुटुंबांत घरातील नवराबायको उभयता पोटापाण्याची सोय लावण्यासाठी घराबाहेर राबत. तुटपुंज्या अथवा मोजक्या कमाईपायी मुलाबाळांची शिक्षणे पूर्ण करणे अशक्य बनल्याने अशा कुटुंबांतील मुले शिक्षण व शाळा अर्धवटच सोडत. साहजिकच, त्यांच्या ठायीची कौशल्ये व प्रशिक्षणाचा दर्जा निम्नस्तरातील असे. परिणामी, चांगला दर्जेदार रोजगार मिळण्यापासून वंचित राहिल्याने त्यांच्या वाट्याला अभावग्रस्ततेचे जिणे यावे, हे ओघानेच आले.

अशा या सगळ्या पार्श्वभूमीवर, अमेरिकी अर्थव्यवस्थेमध्ये रोजगारनिर्मिती घडवून आणण्याबाबत, अमेरिकी अर्थव्यवस्थेतील पायाभूत सेवासुविधांमध्ये सरकारी गुंतवणूक वाढवण्याबाबत ट्रम्प यांनी त्यांच्या प्रचारादरम्यान दिलेली आश्वासने मतदारांना आकर्षक न वाटती तरच नवल. अमेरिकी वस्तुनिर्माण उद्योगांचा -हास घडून आल्यामुळे रोजगार गमावलेल्यांबाबत काही ना काही करण्याचा मनोदय ट्रम्प यांनी व्यक्त केला. केवळ इतकेच नाही तर, अमेरिकी अर्थव्यवस्थेतील बस्तान गुंडाळून अन्यत्र संसार थाटलेल्या मुळातील अमेरिकी वस्तुनिर्माण उद्योगांना पुन्हा एकवार अमेरिकेमध्ये परत आणण्याचा मनसुबाही ट्रम्प यांनी निवडणूकपूर्व प्रचारादरम्यान मुखर केला होता. या सा-या प्रतिपादनाला आर्थिक राष्ट्रवादाचा गंध येत असला तरीही ट्रम्प यांची ती सारी भूमिका अमेरिकी मतदात्यांना, आणि, त्यांतही खास करून तरूण, नवोदित अमेरिकी मतदारांना भिडणारी अशीच होती.

एका अर्थाने, अमेरिकी मतदारांची ती मानसिकता प्रातिनिधिक म्हटली पाहिजे. प्रस्थापित राजकीय त्या विचारप्रणालीला स्वीकारार्ह असणारे उदारमतवादी अर्थकारण, खुल्या बाजारपेठेचा व मुक्त जागतिक व्यापाराचा आग्रह धरणारी अर्थप्रणाली मतदारांना भावत नव्हती. प्रस्थापित राजकीय संस्कृती आपल्या भावभावनांची कदर करत नाही, अशी भावना पोटी बळावलेल्या अमेरिकी मतदारांना म्हणूनच बदल हवा होता. ●●

राजकारण

# आर्थिक राष्ट्रवाद आणि राजकारण

अर्थकारण आणि राजकारण यांच्यादरम्यानचे नाते बहुतांशी द्वंद्वात्मकच राहिल्याचे वास्तव भवताली सतत उभरत असते. राजकारणाला असोशी असते ती राजकीय व्यवस्थेने निवडलेल्या धोरणांची निकटच्या भविष्यात अनुकूल अशी निष्पत्ती दृश्यमान होण्याची. तर, अर्थकारणात 'शॉर्ट टर्म'मध्ये फारसे काहीच घडत नसते. कोणत्याही आर्थिक धोरणाचे अपेक्षित वा अनपेक्षित परिणाम सम्यक्‌पणे साकारायला बराच कालावधी जावा लागतो. राजकीय व्यवस्थेतील धुरिणांना इतका वेळच नसतो. कारण, आपण निर्माण केलेल्या धोरणांचे अपेक्षित असे परिणाम लगोलग व्यवहारात अवतरून त्यांची गोमटी फळे चाखायला मिळाल्याने खूष झालेल्या मतदारांच्या अनुकूल मतदानाद्वारे मिळणा-या समर्थनावर त्यांना सत्तासिंहासन उपभोगावयाचे असते. खुल्या बाजारपेठीय अर्थकारणाचे आणि मुक्त जागतिक व्यापाराचे समर्थन करणारी अर्थशास्त्रीय विचारप्रणाली आणि नजीकच्या भविष्यातील राजकीय लाभांवर नजर स्थिर ठेवून असणा-या राजकीय व्यवस्थेद्वारे अलीकडील काळात आर्थिक राष्ट्रवादाचा केला जात असलेला पुरस्कार यांच्यातील ताणातील बीज नेमक्या याच द्वंद्वामध्ये रुजलेले सापडते.

देशादेशांदरम्यानचा व्यापार हा त्या व्यवस्थेत सहभागी असलेल्या सर्वच देशांना अंती लाभदायक ठरत असतो, ही भूमिका डेव्हिड रिकार्डो यांनी विकसित केलेल्या 'कम्पॅरिटिव्ह कॉस्ट ॲडव्हान्टेज्'च्या सिद्धांताच्या बळावर आजवर नांदत आलेली आहे. परंतु, डोनल्ड ट्रम्प यांची 'अमेरिका फर्स्ट' ही घोषणा असो अथवा भारताचे पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांनी केलेले 'मेक इन् इंडिया'चे ऐलान असो, आर्थिक राष्ट्रवादाच्या भावनेचा पुरस्कार करण्याची अशी प्रेरणा जगभरातील अनेक देशांमध्ये आज अंकुरताना दिसते. या ऊर्मीमागील राजकीय वास्तवाचे आकलन नीटपणे करून घ्यावयास हवे.



या संदर्भातील आजवरचा अनुभव अतिशय रंजक आहे. नव्यानेच औद्योगिक प्रगती साध्य करत असलेले राष्ट्र, औद्योगिकदृष्ट्या प्रगत असलेल्या अन्य देशांकडून निर्माण होणा-या कडव्या स्पर्धेपासून स्वदेशी उद्योगांना संरक्षण देण्याच्या हेतूने मुक्त व्यापाराच्या भूमिकेचा व तत्त्वज्ञानाचा प्रतिवाद करत राहते. आमच्या देशातील उद्योग सध्या बाल्यावस्थेमध्ये आहेत आणि प्रगल्भ व प्रौढ औद्योगीकरण घडून आलेल्या देशांकडून उभ्या राहणा-या तगड्या जागतिक स्पर्धेत बाल्यावस्थेतील ते उद्योग कोलमडून पडण्याचा धोका असल्याने आयात-निर्यात शुल्के अथवा निर्यात कोटा यांसारख्या शुल्केतर साधनांचा अवलंब वैश्विक व्यापाराच्या व्यवस्थेत अपरिहार्य व आवश्यक आहे, अशा प्रकारचे प्रतिपादन नवऔद्योगिक राष्ट्रांकडून होत राहते. परंतु, मजेचा भाग असा की, एके काळी नवऔद्योगिक पर्वात प्रगतिपथावर झगडत असलेली तीच राष्ट्रे, औद्योगिकदृष्ट्या चांगल्यापैकी प्रगत व प्रस्थापित झाल्यानंतर मात्र मुक्त व्यापाराचे, अनिर्बंध व्यापारव्यवस्थेच्या लाभांचे पवाडे गाण्यास सुरुवात करतात. थेट १९व्या शतकापासून जगभरात आजवर याच वास्तवाचे दर्शन ठिकठिकाणी वारंवार घडत आलेले आहे.

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

अर्थकारण आणि राजकारण यांच्यादरम्यानच्या वैशिष्ट्यपूर्ण नात्याचा उलगडा नीट करून घेणे उपयुक्त ठरते ते हाच विरोधाभास नीट समजावून घेण्यासाठी. जागतिक स्तरावरील मुक्त, निर्बंधरहित व्यापाराच्या फायद्यांबाबत अर्थवेत्ते निःशंक असले तरी राजकीय व्यवस्थेतील धुरीण मात्र त्यांबाबत सदैव साशंकच असतात. परिणामी, पूर्णपणे मुक्त व्यापाराला वाव देणा-या धोरणांचा अंगीकार करण्याऐवजी अधिकाधिक मुक्त, त्यांतल्या त्यांत निर्बंधरहित अशा व्यापारव्यवस्थेची तळी उचलून धरण्याकडे त्यांचा व्यावहारिक कल राहतो. आयात-निर्यात शुल्कांचे दर किमान पातळीवर सरासरीने असावेत, निर्यातीसंदर्भातील विविध निर्यातदार देशांचा 'कोटा' नियमित करणारी प्रणाली कार्यरत राहावी यांबाबत राजकीय नेतृत्त्वाचा कौल अनुकूल असतो. मर्यादित प्रमाणात मुक्त असणारा व्यापार आणि देशी उद्योगधंद्यांना संरक्षण पुरविणा-या धोरणप्रणालीबाबत राजकीय नेते पूर्णतः सकारात्मक भूमिका बाळगतात. मुक्त व्यापाराबाबत देशोदेशींच्या राजकीय व्यवस्थेतील धुरिणांकडून अशा प्रकारचा वास्तववादी सावधगिरीचा पवित्रा स्वीकारला जाण्यामागे असणारी कारणप्रणालीही अगदीच दुर्लक्ष करण्याजोगी नाही.

उभ्या देशाच्या अर्थकारणाचा विचार करता खुला, अनिर्बंध व्यापार जरी लाभदायक असला तरी अशा मुक्त व्यापाराद्वारे पदरात पडणा-या लाभांचे देशांतर्गत वाटप व्यवहारात असमान, विषम राहते, ही बाब दृष्टिआड करणे राज्यकर्त्यांना परवडणारे नसते. मुक्त व्यापाराचे समर्थन करणा-या ब्रिटनमध्ये खुल्या व्यापाराला पूरक मानसिकता निर्माण होण्यामागील कारणे आपण या आधी बघितलेली आहेत. मक्याच्या आयातीवरील निर्बंध जारी करणारे कायदेकानून बदलण्यासाठी तिथे झालेल्या चळवळीला यश येऊन संबंधित कायदे विसर्जित करण्यात आले. परिणामी, जमीनदार वर्गाला त्याचा फटका बसला पण ब्रिटनमधील कारखानदार आणि कामगार वर्ग मात्र त्यांमुळे संतोष पावला. मक्याची आयात मुक्त बनल्यामुळे मक्याचे देशी बाजारपेठेतील भाव आटोक्यात राहून वेतनवाढीबाबतची कामगारांची मागणी शमली. पगारवाढ लागू करण्याची अपरिहार्यता टळल्यामुळे कारखानदारांच्या नफाप्रदतेला कसर लागण्याचा प्रसंग टळला. मक्यासारखे मुख्य खाद्यान्न रास्त दरांत मिळू लागल्याने कामगारही आनंदी होते.



परंतु, ब्रिटनमधील जमीनदार वर्गाला कोणताच दिलासा या सगळ्यांत त्या काळी मिळाला नाही. आजही घडताना दिसते ते यांपेक्षा काहीच निराळे नाही. वस्तुनिर्माण उद्योगांचे वैश्विक केंद्र म्हणून चीनचा उदय १९८०च्या दशकानंतर क्रमाने घडून आला आणि अमेरिकी भांडवल तसेच तंत्रज्ञान चिनी अर्थव्यवस्थेकडे सरकले. अनेक अमेरिकी उद्योगांनी त्यांचा कारभार चिनी भूमीवर थाटला. परिणामी, चिनी वस्तुनिर्माण उद्योगाचा पाया विस्तारण्याबरोबरच औद्योगिक रोजगारही तिथे दमदारपणे वाढला. नेमक्या याच दोन आघाड्यांवर अमेरिकी अर्थव्यवस्थेची पीछेहाट चालू राहिली. मात्र, गंमत अशी की, अमेरिकेच्या पूर्व आणि पश्चिम किना-यावरील समृद्ध राज्यांच्या अर्थव्यवस्थांना त्या वास्तवाचे चटके फारसे बसलेच नाहीत. रोजगारनिर्मितीला लागलेली घरघर अमेरिकेच्या मध्य भूभागावर वसलेल्या राज्यांच्या अर्थव्यवस्थांना वेटाळू लागली. दुसरीकडे, सर्वसाधारण अमेरिकी नागरिक मात्र या व्यवस्थेबाबत समाधानी होता. कारण त्याला हव्या असलेल्या वस्तू किफायतशीर बाजारभावांत त्याला मिळत होत्या. त्या जिनसांचे उत्पादन चीनमध्ये होते आहे आणि परिणामी अमेरिकी नागरिकांपैकीच काहींच्या रोजगारावर त्यांपायी गदा येते आहे, याचे व्यवहारात त्याला काहीच सोयरसुतक नव्हते. चिनी भूमीवर उत्पादनाचा व्याप थाटलेल्या अमेरिकी कंपन्याही खूष होत्या कारण चिनी मनुष्यबळ तुलनेने स्वस्त असल्याने त्यांची नफाप्रदता चांगली घसघशीत होती. या सगळ्या लाभांच्या तुलनेत काही राज्यांतील रोजगारांचा घडून आलेला -हास, लाभार्थींच्या लेखी, तितकासा चिंताविषय नव्हता. तत्कालीन ब्रिटनमध्ये घडले ते नेमके असेच. मक्याच्या खुल्या आयातीपायी सुबत्तेचा -हास झालेल्या जमीनदारांना नफाप्रदता बुलंद राहिलेल्या ब्रिटिश कारखानदारांनी कोणत्याही प्रकारची नुकसानभरपाई वगैरे अजिबात दिली नाही. आजही, चीनमध्ये भांडवल गुंतवणा-या अमेरिकी उद्योगपतींना आपण यांत काही तरी चुकीचे अथवा अनुचित करतो आहोत, असे अजिबात वाटलेले नाही. मुक्त व्यापाराच्या लाभांचे देशांतर्गत असे जे विषम वाटप होते त्यापेक्षाही त्या व्यापारात सहभागी असणा-या भागीदार देशांमधील लाभतोट्याचा मुद्दा खुल्या व्यापाराच्या विरोधकांना अधिक जिव्हाळ्याचा वाटतो.

आर्थिक राष्ट्रवादाची पाठराखण करणा-या राजकीय प्रवृत्तींच्या लेखी मुक्त व्यापाराची बाकी अखेर शून्यच राहते. कारण, अशा व्यापारात एका देशातील काही आर्थिक-औद्योगिक घटकांचा लाभ होत असला तरी तो लाभ दुस-या देशातील नफा, रोजगार, उत्पादनवाढ यांच्या मुळावर येणारा असतो. म्हणजेच, एका देशाचा तोटा दुस-या देशाच्या लाभाला छेद देतो. अशा परिस्थितीत, ज्या देशाच्या लेखी असा व्यापार हे फायद्याचे कलम ठरत नसते त्या देशातील राजकीय व्यवस्थेमध्ये सक्रिय असणारे घटक मग वैश्विक व्यापाराला विरोध करण्याची भूमिका मांडायला लागतात. त्याचे कारणही सोपे असते. व्यापाराचे लाभ पदरात पडणारे अथवा पाडून घेणारे आर्थिक-औद्योगिक घटक हे दुस-या देशातील असल्याने 'परके' आहेत; तर, या व्यवहारात घाट्याचे दान पदरात आलेले आर्थिक-औद्योगिक घटक 'आपले' आहेत, अशी व्यापारविरोधक राजकीय वृत्ती-प्रवृत्तींची ठाम धारणा असते. साहजिकच, 'आपल्या' उद्योगांना, त्यांत रोजगार मिळवलेल्या 'आपल्या' कामगारांना संरक्षण देण्याची आर्थिक धोरणात्मक भूमिका राजकीय लाभाचीही ठरायला लागते. जगभरात आर्थिक राष्ट्रवादाची जी सरशी आताशा होताना दिसते तिच्यामागील राजकीय तर्कशास्त्र हेच.

व्यापारामागील निखळ आर्थिक तर्क आणि राजकीय व्यवहार यांच्यादरम्यानचा संघर्ष निपजतो तो नेमका इथेच. व्यापारावरील कोणतेही निर्बंध हे अखेर अ-तार्किक व अर्थकारणाच्या प्रकृतीच्या लेखी अंतिमतः प्रतिकूलच ठरतात, ही अर्थवेत्त्यांची शास्त्रीय काट्यावर घासून घेतलेली भूमिका. जी वस्तू देशात उत्पादन करण्यापेक्षा आयात करणे स्वस्त पडते ती वस्तू, केवळ आर्थिक राष्ट्रवादाची तळी उचलण्यासाठी देशी अर्थव्यवस्थेतच निर्माण करण्याचा हट्ट धरल्याने एकवेळ देशात रोजगार टिकेल-वाढेल. परंतु, त्यांपायी कार्यक्षमतेच्या तत्त्वाची सरसहा पायमल्ली होत राहील, असा युक्तिवाद अर्थतज्ज्ञ करत राहतात. अशा धोरणांपायी जागतिक स्तरावरील सर्वसाधारण कल्याणाची पातळी खालावेल, अशीही तक्रार ते करतील. राजकीय नेत्यांचे या संदर्भात म्हणणे असते की - मला माझ्या मतदारांच्या कल्याणाची चिंता आहे. वैश्विक समुदायाच्या सरासरी कल्याणाचा भार मी का वाहावा ? ते थोडेच माझे मतदार आहेत ? ●●



*(पृष्ठ क्रमांक ४ वरून)*

समाजव्यवहारांत अनंत रूपांनी पदोपदी अनुभवास येणारा भ्रष्टाचार आणि त्याच्या कुशीतून होणारी काळ्या पैशाची बेहिशेबी निपज, या दोहोंबाबत अगदी सामान्य, बिनचेहे-याच्या माणसाच्या मनात दाटलेली चीड सत्ताधा-यांना किती अचूक ठाऊक असते, तेही या निमित्ताने पुरेसे उघड झाले. त्या प्रचंड असंतोषाला, घुसमटीला, त्या मुस्कटदाबीमधून धुमसणा-या हतबलतेला नोटाबदलीच्या माध्यमातून सत्ताधा-यांनी कमालीच्या नेमकेपणे कुरवाळले. सत्ताधारी सरकारच्या धुरीणांचे हे राजकीय कौशल्य, आवडो अथवा न आवडो, पण दाद देण्यासारखेच आहे, हे कबूल करायलाच हवे. ''जुन्या नोटा बाद ठरवल्याने आपल्याला दोन-चार महिने त्रास झाला तरी बेहत्तर; परंतु त्यांमुळे, लोकव्यवहार नासवणा-या मस्तवाल प्रवृत्तींच्या बेहिशेबी संपत्तीवर कु-हाड चालवली जात असेल तर थोडीशी गैरसोय काही काळापुरती सहन करायला काय हरकत आहे'', अशी स्वतःच्या मनाची समजूत घालत सर्वसामान्यांनी नोटाबदलीचा आनुषंगिक त्रास नेमस्तपणे सोसला. ज्या काळ्या पैशाबद्दल सामान्य नागरिकाला घृणा, संताप आणि हताशता अशा त्रिविध भावना आहेत त्या भावनांचे उद्दीपन घडवत अतिशय कौशल्याने शासनकर्त्यांनी नोटाबदलीचा निर्णय रेटून नेला. या सगळ्याला आणखी एक पदर होता. तोही तितक्याच राजकीय कलमकारीने, कुशल कलाकुसरीने सजवलेला. काळ्या पैशाच्या विरोधातील, नकली नोटांच्या निराकरणासाठी शासनाने उघडलेली ही मोहीम म्हणजे वास्तवात एक अत्यंत संवेदनशील, जिव्हाळ्याचे असे राष्ट्रकार्य आहे आणि त्या राष्ट्रकार्यामध्ये समाजातील प्रत्येक नागरिकाने या ना त्या स्वरूपात आपला हविर्भाग अर्पण करायलाच हवा, अशी भूमिका फार मार्मिकपणे, पद्धतशीररीत्या मोठ्या प्रमाणावर क्रमाक्रमाने रुजवण्यात आली. त्यांमुळे, नोटाबदलीपायी सोसाव्या लागणा-या गैरसोयीबाबत तक्रार करणे म्हणजे एका परीने विलक्षण सुभग, सकारात्मक अशा देशकार्याबाबत विरोधी सूर लावणे, असे समीकरण प्रस्थापित केले गेले. म्हणजेच, नोटाबदली हे एक निखळ आर्थिक असे धोरणात्मक पाऊल न राहता ते निरामय राष्ट्रबांधणीचे एक सूत्र म्हणून सादर केले गेले. साहजिकच,

नोटाबदलीबाबत निषेधाचा अथवा नापसंतीचा सूर लावणे म्हणजे राष्ट्रवादाची जाणीव आपल्या ठिकाणी कमअस्सल आहे याचा जणू कबुलीजबाबच देणे, अशी मानसिकता निर्माण व्हावी यासाठी सगळी वैचारिक सिद्धता हुषारीने विकसित करण्यात आली. हे सगळे असे कशामुळे साध्य बनले, हे जाणून घेण्यासाठी प्रचलीत विचारविश्वाचे सूक्ष्मपणे समीक्षण करण्याची संस्कृती आपल्याला जोपासावी लागणार आहे. राष्ट्रवादाच्या जाणिवेला पद्धतशीरपणे खतपाणी घालण्याचे प्रयत्न आजघडीला जगभरात सर्वत्रच कमीअधिक प्रमाणात चालू आहेत. कोणत्याही राष्ट्रातील नागरिकांना आपल्या देशाबद्दल प्रेम वाटावे, अभिमान असावा हे नैसर्गिकच ठरते. परंतु, त्या राष्ट्रप्रेमाला संकुचित राष्ट्रवादाची कल्हई लावत 'आपण' आणि 'परके' अशा विद्वेषजनक फुटीरतेचा परिपोष करण्याची प्रवृत्ती ठिकठिकाणी मूळ धरते आहे. उदार अर्थकारणाची तळी उचलून धरणा-या धोरणांच्या स्वीकाराद्वारे गेली सुमारे साडेतीन दशके साकारत आलेल्या जागतिकीकरणाला, खुल्या व्यापाराच्या तत्त्वज्ञानाला आज होत असलेला विरोध हा याच सा-या वैचारिक घुसळणीचा परिपाक होय. अर्थकारण आणि राजकारण यांच्यातील सनातन द्वंद्व त्यांमुळे देशोदेशी नवनवी रूपे धारण करते आहे. दुस-या महायुद्धानंतर आजवर सद्दी चालत आलेल्या बाजारपेठीय अर्थकारणाच्या तात्विक चौकटीला मिळत असलेल्या राजकीय प्रतिसादाचे काही आयाम 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकात सादर करण्याचा नम्र प्रयत्न केलेला आहे. ●●

---

**प्रमुख संदर्भ**


**(A) पुस्तके :**

(1) POLITICSHOCK : Trump, Modi, Brexit & the Prospect for Liberal Democracy, MEGHANAD DESAI, Rupa Publications India Pvt. Ltd., New Delhi, 2017.

(2) THE NEW PALGRAVE : A DICTIONARY OF ECONOMICS, edited by John Eatwell, Murray Milgate and Peter Newman, Volume 4 : Q to Z, The Macmillan Press Limited, London, 1987.


●●



## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **२०० / - रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **३५०/ - रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **५००/ - रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **८०० /- रुपये** |

# ग्रंथालयातील पुस्तके

● **DEMONETISATION DECODED**
**A Critique of India's Currency Experiment**

By - Jayati Ghosh, C. P. Chandrasekhar and Prabhat Patnaik, Routledge Focus, A Routledge India Original, Taylor and Francis Group, New York, First South Asia Edition 2017, Exclusively distributed by Manohar Publishers & Distributors, New Delhi, India, Pages - 104, Price - Rs. 350/-.

गेल्या वर्षीच्या ८ नोव्हेंबर २०१६च्या रात्री आठ वाजल्यापासून 'डिमॉन्‌टायझेशन' ही संज्ञा वा शब्द आता आपल्या रोजच्या भाषाव्यवहाराचा घटक बनलेला आहे. खरे पाहता, या संज्ञेला नेमका असा मराठी प्रतिशब्द नाही. 'नोटाबंदी' असे त्या संज्ञेचे सुटसुटीत मराठी रूप व्यवहारात रूढ झाले खरे. परंतु, ते काही 'डिमॉन्‌टायझेशन' या इंग्रजी शब्दाचे निरपवाद मराठी रूपांतरण नव्हे. गेले संपूर्ण एक वर्ष आपले सगळे आर्थिक चर्चाविश्व त्या एका घटनेने पूर्णतः व्यापून टाकलेले आपण अनुभवले. त्या निमित्ताने विविध माध्यमांमधून अपार लेखन प्रसिद्ध झाले. चर्चा-परिसंवादांचा धुरळा तर इतका उदंड उडाला की विचारूच नये. 'डिमॉन्‌टायझेशन' या एकंदरच संकल्पनेची सखोल, चौफेर चर्चा करणारे काही दर्जेदार वाचनसाहित्यही या गेल्या वर्षभरात प्रकाशात आले. प्रस्तुत ग्रंथ हा त्यांपैकीच एक. 'डिमॉन्‌टायझेशन' या संज्ञा-संकल्पनेचा अर्थ, काही विशिष्ट दर्शनी मूल्याच्या चलनाला असलेली अधिमान्यता काढून घेण्यासारखे पाऊल उचलले जाण्यामागील तर्कशास्त्र, कार्यकारणभाव, आजवरचा या संदर्भातील अन्य देशांचा अनुभव, नोटाबदलीच्या निर्णयाची आपल्या देशातील अंमलबजावणी, नोटाबदलीचा भारतीय अर्थकारणावर आजवर जाणवलेला परिणाम... अशांसारख्या विविध पैलूंना साधार व विश्लेषक स्पर्श करणारा हा दस्तऐवज सर्वच स्तरांतील व वर्गांतील वाचकांना रोचक वाटेल. ●●



RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: PCW/115/2016-2018
Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ● 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ● भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ● अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ● इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ● संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

● संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

● अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

● विकास चित्रे ● किशोर चौकर ● सुरिंदर जोधका ● रमानाथ झा
● अभय टिळक ● रवींद्र ढोलकिया ● ललित देशपांडे ● दिलीप नाचणे
● सुहास पळशीकर ● मनोहर भिडे ● नीळकंठ रथ ● रूपा रेगे-नित्सुरे
● एस. श्रीरामन

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**